**नियमीत दिवाणी दावा क्र १६/२०२४**
**नंदा वि वैशाली**
**निशाणी क्र १९**

**<u>वादी तर्फे साक्षीदार क्रमांक १ - नंदा नारायण ओहळ, वय – ५७ वर्षे, धंदा - मजूरी, राहणार - मोडनिंब, तालुका माढा, जिल्हा सोलापूर.</u>**

**१.** शपथेवर निवेदन करते की, पुरावा शपथपत्रातील मजकूर माझ्या सांगण्याप्रमाणे लिहिण्यात आलेला असून तो मला वाचून दाखविण्यात आलेला असून, त्यावर मी माझ्या सहीचा निशाणी अंगठा लावलेला आहे. शपथपत्रातील मजकूर खरा व बरोबर आहे.

**२.** दावा मागणीस दूजोरा देण्यासाठी खालील कागदपत्र दाखल केलेले आहेत.

1. संगणकीय प्रणालीद्वारा वादमिळकतीचा प्राप्त केलेला ७/१२ उतारा, निशाणी ४/१.
2. दिनांक १३.०४.२०१६ रोजीच्या मृत्युपत्राची छायांकित नक्कल, निशाणी ४/२.
3. दिनांक ०८.०३.२०२१ रोजीच्या मृत्युपत्राची छायांकित नक्कल, निशाणी ४/३.
4. दिवाणी किरकोळ अर्ज क्र ३७/२०२२ या प्रकरणातील निशाणी १ ची प्रमाणित नक्कल, **<u>निशाणी १९/१</u>**.
5. वरील प्रकरणातील पारीत झालेल्या न्यायनिर्णयाची प्रमाणित नक्कल, **<u>निशाणी १९/२</u>**.
6. प्रतिवादी क्र १ ने प्रतिवादी क्र २ च्या हक्कात नोंदविलेल्या खरेदीखताची प्रमाणित नक्कल, निशाणी ४/६.

**<u>उलटतपास प्रतिवादी क्र १ तर्फे वकील, श्री एस आर मेहता यांचेमार्फत</u>**

**३.** मला लिहिता-वाचता येत नाही. माझ्या लाभात जे मृत्युपत्र करुन ठेवण्यात आलेले आहे असे जे माझे म्हणणे आहे, ते मृत्युपत्र मी पाहिलेले आहे. मृत्युपत्राची तारीख मला सांगता येणार नाही, पण ते २०१६ सालचे आहे. मृत्युपत्र करतेवेळी मी स्वतः तेथे हजर होते. दूसरा इसम तिथे मृत्युपत्र करतेवेळी कोण हजर होता ते मला आठवत नाही. मृत्युपत्र करुन ठेवणारी महिला देखील ही अडाणी होती. हे म्हणणे खरे नाही की, मृत्युपत्रातील मजकूर व माहिती मी स्वतःच

सांगितलेला होता. मृत्युपत्रातील मजकूर कोणी सांगितला ते मला आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्या मृत्युपत्राचा मुळ दस्त माझ्याकडे नाही. तो मी दाखल करण्यास तयार आहे.

**उलटतपास पुढील तारखेपर्यंत विनंतीवरुन तहकूब.**

श्रवणोत्तर स्विकृत,

KARADE RATILAL MACHINDRA

Digitally signed by KARADE RATILAL MACHINDRA
Date: 2025.12.16 12:39:11 +0530

(आर एम कराडे)

दिनांक - १६/१२/२०२५.

दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर, माढा.